जा.क्र./मनपा/बीओटी/२०१५/संकीर्ण
कार्यालय महानगरपालिका औरंगाबाद
दिनांक :- २२.०४.२०१५.

प्रति
उप सचिव,
नगर विकास विभाग,
मंत्रालय, मुंबई-३२

विषय :- औरंगाबाद महाराष्ट्र आणि Dunhuang चीन या शहरामध्ये Sister City Relationship बाबत सामंजस्य करार करण्या संदर्भात.

संदर्भ :- आपले पत्र क्र.अनौसं-२०१५/औमपा/०२/नवि-२४, दि. २२.४.१५

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने संदर्भिय पत्रात नमुद केल्यानुसार चायनीज डेलिगेशने औरंगाबाद शहरास दिलेल्या भेटीच्या अनुषंगाने तयार करण्यात आलेली सविस्तर टिपणी सोबत सलग्न करण्यात आलेली आहे. करिता माहितीस्तव.

आयुक्त
महानगरपालिका औरंगाबाद

सोबत :- वरील प्रमाणे.

# चायनिज डेलिगेशन भेटी बाबतची टिपणी

श्री यंग यौंग (कॉन्सील) हे चायनिज डेलिगेशनचे कन्सुलेट जनरल ऑफ पी.आर. चायना असुन यांचे कार्यालय मुंबई येथे आहे. श्री यंग यौंग त्यांनी औरंगाबाद महानगरपालिकेशी संपर्क करुन चीन देशातील घांसु क्षेत्राचे चायनिज डेलिगेशन औरंगाबाद शहरास भेट देणार असुन भेटी दरम्यान ते शहरातील संस्कृती, शहरातील पर्यटन स्थळे व ऐतिहासीक स्थळे इत्यादी बाबत विचारांची देवाण-घेवाण करणार असल्याचे कळविले आहे.

त्या अनुषंगाने घांसु क्षेत्राचे श्री लुझींग लाई, डेप्युटी डायरेक्टर जनरल, फॉरेन अफेअर्स ओव्हरसीज चायनीज अफेअर्स हॉगकॉंग ॲन्ड मकाऊ अफेअर्स घांसु पीपल्स गव्हरमेंट व इतर यांनी दिनांक ९ ते ११ मार्च २०१५ या कालावधीत औरंगाबाद शहरास भेट दिली असता, महानगरपालिकेच्या स्थायी समिती सभागृहात त्यांचे भव्य स्वागत करण्यात आले असुन या स्वागत समारंभास मा. महापौर सौ. कला रविनंदन ओझा, मा. सभापती-स्थायी समिती श्री विजय वाघचौरे महानगरपालिकेचे इतर पदाधिकारी व अधिकारी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या ठिकाणी शहरातील ऐतिहासीक स्थळे जसे की, पानचक्की, बी-बीका मकबरा, ऐतिहासीक दरवाजे आणि जगप्रसिध्द अंजटा व वेरुळ लेणींची माहिती स्लाईड शोच्या माध्यमातुन दाखविण्यात आली. यानंतर आर्कीलॉजीकल विभागात संबंधित अधिकारी यांचे समवेत बैठक संपन्न झाली. तसेच शहरातील ऐतिहासीक पानचक्की, बी-बीका मकबरा, ऐतिहासीक दरवाजे दाखविण्यात आले. चायनिज डेलिगेशनसाठी सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करुन त्यांना महाराष्ट्रीय पध्दतीचे फेटे परिधान करुन त्यांचे स्वागत करण्यात आले.

तसेच या सर्व बाबींसाठी मेमोरेंडम ऑफ अंडरस्टॅंडिंग करावयाचे असल्याने त्यासाठी मा. महापौर, औरंगाबाद आणि मा. महापौर डनहॉंग शहर यांचेमध्ये लेटर ऑफ इंटेट झालेला आहे. जगप्रसिध्द अंजटा आणि वेरुळ लेणी सारख्याच कलाकृती ह्या चीन देशातील मकाऊ शहरात देखील असल्याने त्याचे जतन व संवर्धन कशा पध्दतीने करता येईल हा एक उद्देश असल्याने त्याची माहिती घेणेसाठी सदर डेलिगेशन औरंगाबाद शहरात आले होते. त्यांना केलेल्या सहकार्य बद्दल त्यांनी समाधान व्यक्त केलेले आहे.

दिनांक २९ ते ३१ मार्च २०१५ या कालावधीत श्री सॉंग रॉंगयो, सेक्रेटरी जनरल, चायना पब्लिक डिप्लोमेसी असोसिएशन व्हीजीटींग प्रोफेसर चायना युनिवर्सिटी ऑफ फॉरेन अफेअर्स हे औरंगाबाद शहरात आले असता, त्यांचे सुध्दा महाराष्ट्रीय पध्दतीने स्वागत करण्यात आले असुन त्यांचेसाठी सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. तद्नंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ येथील कुलगुरु आणि विद्यापीठातील सर्व विभाग प्रमुख, पर्यटन विभागाचे विभाग प्रमुख तसेच महाराष्ट्र पर्यटन विकास मंडळाचे अधिकारी यांचे समवेत एकत्रित चर्चासत्र संपन्न झाले असुन या डेलिगेशनने औरंगाबाद शहरास पुन्हा भेट देणार असल्याचे नमुद केले आहे.

चायना व औरंगाबाद ट्युन सिटी शेअरींग बेस्ट प्रॅक्टीसेस ॲन्ड कल्चरल हेरीटेज व रिसर्च वर्क या बाबींवर चायनिज डेलिगेशनचे जास्त लक्ष असल्याचे निदर्शनास आले आहे.

आयुक्त
महानगरपालिका औरंगाबाद